आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

## महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद, महाराष्ट्र

## School Leadership Academy

## Maharashtra

## मोड्यूल क्र.१४

# “महाराष्ट्रातील आदिवासी दुर्गम भागातील किशोरवयीन मुलींच्या शिक्षणात मासिक पाळी व्यवस्थापनासंबंधी शालेय नेतृत्वाची भूमिका”

# The Role of School Leadership in Menstrual Management in the Education of Adolescent Girls in Remote Tribal areas of Maharashtra

सर्वांसाठी शिक्षण महत्त्वाचे आहे मग ते स्त्री, पुरुष, दिव्यांग व ट्रांसजेंडर कोणीही असो, सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळाली आहे. स्त्रियांना देखील शिकण्याची समान संधी आहे.मुलींच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व परिपोषण करणारे महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय. कोणत्याही समाजाच्या संस्कृतीची पातळी ही त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे यावरून ठरते. एकविसाव्या शतकात स्वतंत्र भारतातील स्त्री शिक्षण हे क्रांतीच्या मोठ्या टप्प्यावर आहे. प्रामुख्याने शहरी भागापुरते मर्यादित असलेले स्त्री शिक्षण आता ग्रामीण, दुर्गम, आदिवासी भागापर्यंत विस्तारलेले आहे. एक स्त्री शिकली, तर सारे कुटुंब साक्षर होते, संस्कारक्षम होते या महात्मा फुले यांच्या वचनाला स्मरून स्त्री शिक्षणाला भारताने प्राधान्यक्रम दिला आहे. म्हणून सद्य:स्थितीमध्ये मुलींच्या शिक्षणामध्ये प्रगती दिसून येत आहे, परंतु महाराष्ट्रातील आदिवासी दुर्गम भागातील किशोरवयीन मुलींच्या शिक्षणात मासिक पाळी व्यवस्थापन विषयाबाबत बरीच आव्हाने दिसून येतात.प्रामुख्याने किशोरवयीन मुलींमध्ये गळतीचे प्रमाण अधिक दिसून येते. मुलींना शिक्षणाची समान संधी मिळावी म्हणून स्वातंत्र्योत्तर काळापासून विविध आयोग व समित्या यांनी मुलींच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत.

| विविध आयोग व समित्या | स्त्री शिक्षणाची वाटचाल संक्षिप्त मुद्दे |
|---|---|
| विद्यापीठ अनुदान आयोग सन 1948- 49 | स्त्री शिक्षणासाठी विविध सुविधा |
| माध्यमिक शिक्षण आयोग 1952 | मुलींसाठी स्वतंत्र शाळा निर्मिती |
| स्त्री शिक्षणासाठी राष्ट्रीय समिती 1957 | मंत्रालयात स्त्री शिक्षण विभाग स्थापना. |
| कोठारी आयोग सन 1964 | स्त्री शिक्षणाकडे लक्ष, नोकऱ्यांमध्ये संधी |
| राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 | स्त्री शिक्षणाविषयी व्यापक पहिले धोरण, स्त्री - सबलीकरणावर भर |
| राममूर्ती आयोग 1996 | स्त्री-पुरुष समानता, स्त्री-अभ्यास केंद्र,स्त्री सबलीकरणावर भर |
| सर्व शिक्षा अभियान | मुलींसाठी विशेष सुविधा |
| राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 | किशोरवयीन मुला-मुलींना सामाजिक आणि भावनिक मार्गदर्शनाची गरज |
| नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण2020 | सर्व मुलींना गुणवत्तापूर्ण आणि न्यायसंगत शिक्षण प्रदान करण्याच्या दिशेने,राष्ट्रक्षमतांचा विकास करण्याच्या हेतूने “लिंग-समभाव निधी” स्थापना करेल. वसतिगृहात मुलांच्या विशेषत:मुलींच्या सुरक्षिततेच्या सर्व उपाययोजना केल्या जातील.मुलांना शाळेत दाखल करणे आणि भविष्यातील गळती रोखणे यासाठी एकूण दोन उपक्रम हाती घेण्यात येतील. पहिल्या उपक्रमांतर्गत ,पूर्व-प्राथमिक ते इयत्ता 12 वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षित व मोहक शालेय शिक्षण मिळावे यासाठी प्रभावी आणि पुरेशा भौतिक सुविधांचा बाबतीत कोणतीही शाळा मागे राहू नये यासाठी विशेष काळजी घेतली जाईल. मुलींसाठी शाळेपर्यंत पोहचण्याची सुरक्षित व व्यवहार्य व्यवस्था किंवा वसतिगृहे यांची व्यवस्था करेल. |

सावित्रीच्या लेकींच्या शिक्षणाचा विस्तार आज खूप मोठा झाला आहे. एकविसाव्या शतकातील सक्षम नागरिक तथा महिला होण्यासाठी या महाराष्ट्र कन्यांचा शिक्षणाचा प्रवास शहरी, दुर्गम, अतिदुर्गम भागात मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे, परंतु असे असले तरी किशोर वयीन मुलींच्या समस्येकडे फारसे गांभीर्याने पहिले जात नाही. शिक्षणाच्या संधी मिळाल्या परंतु मुलींच्या शारीरिक गरजांनुसार अपेक्षित असलेल्या सुविधा शाळांमध्ये बहुतांश प्रमाणात उपलब्ध झाल्या तरी मासिक पाळी दरम्यान किशोरवयीन मुलींची शाळेतील गैरहजेरी ही प्रामुख्याने चिंतनीय बाब दिसून येते. ह्या बाबीवर देखील प्रभावी नेतृत्वाने मात करता येऊ शकते हा सकारात्मक दृष्टिकोन घेऊन या विषयाकडे पाहणे अपेक्षित आहे.

- **मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -**

१) आदिवासी दुर्गम भागातील किशोरवयीन मुलींच्या शिक्षणात मासिक पाळी व्यवस्थापन संकल्पना समजून घेणे .

२) आदिवासी दुर्गम भागातील किशोरवयीन मुलींच्या शिक्षणात मासिक पाळी व्यवस्थापना बाबत यशोगाथांमधून नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.

3) आदिवासी दुर्गम भागातील किशोरवयीन मुलींच्या शिक्षणात मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत जिल्हास्तर अधिकारी ,मुख्याध्यापक व शिक्षक यांचा दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे.

- **आदिवासी दुर्गम भाग संकल्पना -**

'नागर संस्कृती पासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील रहिवासी म्हणजे आदिवासी'.सर्वसाधारणपणे जंगलात ,दुर्गम, दऱ्याखोऱ्यात असलेल्या प्रदेशात आदिवासी समाज वस्ती करून राहतो. राज्यातील आदिवासी जमातींचे वैविध्य तसेच त्यांचे वास्तव असलेल्या क्षेत्रातील नैसर्गिक ,सामजिक,आर्थिक,परिस्थिती यामुळे आदिवासींच्या विकासातील समस्या,गरजा त्यांची आव्हाने विविध प्रकारची आहेत.भारतात सुमारे 700 आदिवासी जमाती आहेत, त्यांपैकी 45 जमाती आपल्या राज्यात आढळतात.राज्यातील एकूण 36 जिल्ह्यांमधून धुळे ,नंदुरबार, जळगाव, नाशिक, पालघर व ठाणे सह्याद्री प्रदेश तसेच चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूरच्या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्ह्यांमध्ये आदिवासी संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने 45 अनुसूचित जमाती असून त्यात प्रामुख्याने भिल्ल, गोंड महादेव कोळी ,पावरा, ठाकूर, वारली यांचा समावेश आहे. यवतमाळ जिल्ह्यातील कोलाम ,रायगड, ठाणे व पालघर जिल्ह्यातील कातकरी आणि गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंड अशा तीन जमाती केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या आहेत. आदिवासींची संख्या जास्त असलेला महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हा म्हणजे नंदुरबार जिल्हा. नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती सन 1998 मध्ये झाली. नंदुरबार हा आदिवासी बहुल जिल्हा असून येथे भिल्ल, पावरा, टोकरे कोळी, कोकणा, कोकणी व गावित इत्यादी प्रमुख आदिवासी जमाती आहेत .नंदुरबार जिल्ह्यात अनुसूचित जमातींची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असून महाराष्ट्र राज्यात जिल्हा चौथ्या क्रमांकावर आहे. नंदुरबार जिल्ह्यात एकूण सहा तालुके असून त्यांपैकी नवापूर,तळोदा,अक्कलकुवा ,अक्राणी हे चार तालुके पूर्णपणे आदिवासी उपयोजना क्षेत्रात येतात, तर शहादा व नंदुरबार हे दोन तालुके अंशतः आदिवासी उपयोजना क्षेत्रात येतात.

- **किशोरावस्था संकल्पना -**

किशोरावस्था ही साधारणपणे वय वर्षे 10 ते 19 या दरम्यान असते. किशोरावस्थेचा काळ प्रामुख्याने बालपण व तारुण्य यांना जोडणारा असतो. या अवस्थेत शारीरिक मानसिक व भावनिक बदल होत असतात. तसेच किशोरवयीन काळामध्ये लैंगिक बदल देखील झपाट्याने होत असतात. मुले आणि मुली दोघांमध्येही शारीरिक, मानसिक, भावनिक बदल होत असतात. विशेषतः मुलींमध्ये जे बदल होतात त्यात उंची वाढते, स्तन विकसित होतात, मासिक पाळी येण्यास सुरवात होते,विविध प्रश्न पडतात,उत्सुकता वाढते आणि लाजाळूपणा वाढतो. हयात मासिक पाळी हा फार महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

- **मासिक पाळी व्यवस्थापन संकल्पना -**

किशोरावस्थातेतील मुख्य बाब म्हणजे मासिक पाळी होय .या कालावधीत किशोरवयीन मुलींना फार मोठ्या बदलाला सामोरे जावे लागते. मुलींना मासिक पाळी दरम्यान अनेक प्रश्न पडतात. मासिक पाळी बद्दल मुलींना अचूक माहिती नसते. गैरसमजुती व अंधश्रद्धा यांचा पगडा त्यांच्या मनावर ठसलेला असतो.मासिक पाळीच्या वेळेस पाळावयाच्या स्वच्छतेविषयी माहिती नसते.मासिक पाळीच्या वेळेस शाळेत जाताना संकोच वाटतो. मासिक पाळीच्या वेळेत स्वच्छता पाळण्यासाठी परिणामकारक, सहज व सुलभ पर्याय उपलब्ध नसतात. त्यामुळे मासिक पाळी दरम्यान मुली गैरहजर राहण्याचे प्रमाण शाळांमध्ये जास्त दिसून येते. हे सर्व थांबविण्यासाठी मासिक पाळी व्यवस्थापन खूप महत्त्वाचे वाटते. मासिक पाळी ही स्त्री शरीराची एक नैसर्गिक क्रिया आहे. मासिक पाळी विषयी शास्त्रीय समज तयार होण्यासाठी किशोरवयीन मुलींच्या व्यक्तिमत्त्वाचा निकोप विकास व्हावा तसेच मासिक पाळी विषयी शास्त्रीय माहिती मिळावी, मासिक पाळी स्वच्छता व शोषक साहित्यांचा वापर इत्यादी सर्व बाबतीत किशोरवयीन मुलींना माहिती मिळावी म्हणून मासिक पाळी व्यवस्थापन या विषयाकडे लक्ष वेधले आहे.शाळेत येणाऱ्या किशोरवयीन मुलींची कोणत्याही प्रकारे कुचंबणा होऊ नये व त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी मासिक पाळी व्यवस्थापन हा विषय महत्त्वाचा आहे.

- **जागतिक आरोग्य संघटना सन 2009 चा अहवाल**

| मुद्दे | मुलींची टक्केवारी |
|---|---|
| मासिक पाळीच्या दरम्यान मुली शाळेत अनुपस्थित राहण्याचे प्रमाण | 12% |

- **महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात युनिसेफने केलेल्या एका सर्वेक्षणात खालील बाबी नमूद केल्या आहेत.**

| मुद्दे | मुलींची टक्केवारी |
|---|---|
| 11 ते19 वर्ष वयोगटातील किती टक्के मुलींना पहिली मासिक पाळी येण्याअगोदर पाळी बाबत माहिती होती? | फक्त 13% |
| मासिक पाळीच्या दरम्यान किती टक्के मुली शाळेत जात नाहीत? | 60-70% |

अशा परिस्थितीत शाळकरी मुलींना जर वेळीच योग्य शिक्षण व मार्गदर्शन मिळाले, तर परिस्थितीत बदल होईल.हे लक्षात घेऊन ‘स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय’ या मिशन मध्ये या विषयाचा आवर्जून उल्लेख केला आहे.युनिसेफतर्फे मासिक पाळी व्यवस्थानांतर्गत सहा सत्रे तयार करण्यात आली आहेत.या सत्रानुसार राज्यस्तरावर तज्ञ निर्माण करून जिल्हास्तरावर प्रशिक्षण द्यावे व तेथून शाळा स्तरावर प्रशिक्षण संपन्न होणार असा हा नियोजनबद्ध कार्यक्रम. यात प्रामुख्याने खालील विषयांचा समावेश होता .

**सत्र पुढीलप्रमाणे :-**

1) मासिक पाळीविषयी शास्त्रीय माहिती देणे.

2) मासिक पाळी दरम्यान उद्भवलेल्या आव्हानांना तोंड देणे.

3) मासिक पाळीच्या संदर्भात पाळावयाची स्वच्छता व आरोग्य.

4) शोषके योग्य पद्धतीने हाताळणे.

5) मासिक पाळी विषयी शास्त्रीय माहिती देऊन अंधश्रद्धा, गैरसमजुती व रूढी परंपरा दूर करणे.

6) मी,सल्लागार

वरील सर्व सत्राची संपूर्ण माहिती देऊन ,मासिक पाळी बाबत मुलींमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी मासिक पाळी व्यवस्थापन आवश्यक आहे.

- **मासिक पाळी व्यवस्थापन संदर्भात विविध आव्हाने**

- **शाळेशी संबंधित आव्हाने** :--

1) बऱ्याच मुली ह्या मासिक पाळीच्या काळात शाळेत गैरहजर असतात.
2) मासिक पाळी दरम्यान पालक मुलींना शाळेत पाठविण्यास उत्सुक नसतात.
3) मुलींना या दरम्यान शाळेत वावरताना निर्धास्त वाटत नाही,कारण सर्व पुरेशा सुविधा शाळेत नसतात.
4) मासिक पाळी दरम्यान मुलीमंध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होते.अशा वेळेस समुपदेशन कसे करावे ही माहिती शाळांना नसते.
5) किशोरवयात अचानक होणाऱ्या शारीरिक बदलांमुळे मुली खूप गोंधळात असतात.
6) शाळेत मुला-मुलींसाठी वेगवेगळी स्वच्छता गृहे असायला हवीत व कार्यान्वित हवीत .
7) शाळेत नेहमीच हात धुण्यासाठी साबण व पाण्याची व्यवस्था असावी.
8) मासिक पाळी दरम्यान मुलींना पडणाऱ्या प्रश्नांच्या शंकांचे निरसन शाळेत व्हायला हवे.
9) प्रत्येक शाळेत महिला शिक्षिका असतील असे नाही.
10) प्रत्येक महिला शिक्षिकेला मासिक पाळी व्यवस्थापनचे ज्ञान हवे.

- **किशोरवयीन मुलीं पुढील आव्हाने:-**

1) किशोरवयीन मुली शारीरिक व भावनिक बदलामुळे खूप गोंधळलेल्या असतात.
2) किशोरवयीन मुलींच्या शारीरिक बदलांमुळे त्यांच्यामंध्ये न्यूनगंडा ची भावना निर्माण व्हायला सुरवात होते. मुली सहजपणे इतरांशी बोलत नाहीत.संभाषण करताना त्यांना लाज वाटते.
3) मासिक पाळी आल्यामुळे मुली खूप घाबरून जातात.
4) मुलींना मासिक पाळी काळात शाळा सुरक्षित वाटत नाहीत कारण शाळेत सर्वच सुविधा उपलब्ध असतील या बाबत माहिती नसते.
5) स्वच्छता गृहाची सोय शाळेत असते.असले तरी ते कार्यान्वित असतीलच असे नाही
6) आई देखील मुलींना मासिक पाळी काळात शाळेत पाठवीत नाहीत.कारण मासिक पाळी काळात सर्व बाबीची पूर्तता शाळेत असेलच असे नाही.

7) मासिक पाळीत मुलींना अनावश्यक भीतीमुळे शाळेत यायला लाज वाटते.
8) शाळेत शोषक साहित्य कुठे फेकावे असा प्रश्न मुलींना पडतो.
9) मासिक पाळीच्या काळात मुलींना होणाऱ्या सौम्य वेदनामुळे शाळेत यायला त्या नाखूष असतात.
10) मुलींना मासिक पाळी विषयी शास्त्रीय माहितीचा अभाव.

- **पालकांना असणारी आव्हाने :-**

1) पालकांना मासिक पाळी काळात मुलींना शाळेत पाठविणे सुरक्षित वाटत नाही, कारण पुरेशा सुविधा शाळेत असतील याची खात्री नसते .
2) पालकांना मासिक पाळीविषयी परंपरेने चालत आलेले ज्ञान असते.
3) मासिक पाळी विषयी पारंपारिक प्रथांचे पालन आपणाला करावे लागेल असाच समज असतो .
4) मुलीला मासिक पाळी आली म्हणजे मुलींकडे सारखे लक्ष द्यावे लागेल असे पालकांना वाटते
5) मासिक पाळी दरम्यान मुलीं घरीच सुरक्षित असतात असे पालकांना वाटते.
6) मासिक पाळीच्या काळात स्त्रियांना घरकाम, पूजा,मंदिरात जाणे इ.विविध बाबी करण्यास परवानगी दिली जात नाही.
7) स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था शाळेत नसते. शाळेतच मासिक पाळी आल्यास काय करावे याबाबत पालकांना माहिती नसते.
8) दुर्गम भागात माध्यमिक शाळा आणि घर यांतील अंतर सुद्धा बरेच असल्या कारणाने मुलींना होणाऱ्या त्रासामुळे मुली शाळेत येण्यास कंटाळा करतात .

अशा रीतीने वरील आव्हानांना आपण अभ्यास केला तर प्रत्येक व्यवस्थेला पडणारे प्रश्न, सोयी सुविधा इ. बाबींवर लक्ष न दिल्यामुळे मुली मासिक पाळीच्या काळात शाळेपासून दूर जातात. त्यामुळेच मुलींचे शाळेतील उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी नेतृत्वाचा खरा कस लागतो. मासिक पाळी दरम्यान 12 टक्के मुली या शाळेत गैरहजर राहतात हे एका सर्व्हे वरून लक्षात आलेले आहे. अशा विविध आव्हानाना सामोरे जाण्यासाठी शालेय नेतृत्वाला खूप काम करावे लागेल तेव्हा समाजात मासिक पाळी विषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होईल. त्यासाठी नंदुरबार जिल्हातील काही यशोगाथांचा अभ्यास केला, तर आपणास निश्चित या बाबत कामाची दिशा मिळेल. ह्या आव्हानावर मात करण्यासाठी प्रभावी नेतृत्व कसे काम करत आहेत हे या यशोगाथेवरून पाहुया व त्यातून शिकूया

- **यशोगाथा :- 1 नेतृत्वाची साद बनली - स्वाभिमानी स्त्री जीवनाचा प्रतिसाद**

मानव संसाधन विकास मंत्रालय भारत सरकार यांनी ‘ स्वच्छ भारत- स्वच्छ विद्यालय’ राष्ट्रीय अभियान सप्टेंबर 2014 पासून सुरु केले आहे . याच अभियानाचा एका भाग म्हणून मासिक पाळी व्यवस्थापनाकडे लक्ष वेधले आहे.किशोरवयीन मुलींना मासिक पाळी व्यवस्थापनाचे धडे मिळावेत म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र ,पुणे आणि युनिसेफ यांच्या साहायाने मासिक पाळी व्यवस्थापन उपक्रम हाती घेतला आहे.त्या अनुषंगाने जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था,नंदुरबार यांनी नंदुरबार जिल्हातील सर्व महिला शिक्षकांना कोविड 19 च्या काळात ऑनलाइन प्रशिक्षण दिले.या प्रशिक्षणाचा लाभ नंदुरबार जिल्हातील 7000 महिला शिक्षिका ,


अंगणवाडी ताई यांनी घेतला आहे.नंदुरबार जिल्हयातील सर्व शाळांमध्ये सर्व महिला शिक्षिकांनी त्यांच्या शाळेतील सर्व मुलींना मासिक पाळी व्यवस्थापनाचे धडे दिले आहेत.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थाने नेतृत्वाने या कार्यक्रमाची आखणी उत्तम केल्याने नंदुरबार सारख्या आदिवासी दुर्गम भागातील मुलींना मासिक पाळी व्यवस्थापनाचे धडे मिळत आहेत ,खरे तर याचे श्रेय हे नेतृत्वाला जाते.




नेतृत्वाने ठरविले तर अशक्य बाब शक्य होऊन जाते म्हणून नेतृत्व ही बाब कृतीतून साकारता येते.जितकी कृती ही गुणवत्तापूर्ण तितक्या प्रमाणात संस्था,शाळा ही यशोशिखरावर विराजमान होतात. नंदुरबार डायट ने फक्त प्रशिक्षण घेऊन भूमिका संपविली नाही तर प्रत्येक शाळेला प्रत्येक मुलींचे (ई.सहावी ते दहावी ) प्रशिक्षण पूर्ण होईल यासाठी कृतीआराखडा दिला.कृतीआराखडयाची अंमलबजावणी होत आहे की नाही यासाठी सनियंत्रण केले.तालुकानिहाय whats app ग्रुप च्या माध्यमातून अडचणीचे निरसन केले.त्यासाठी सुलभक मार्गदर्शक यादी प्रसारित केली.सदर कार्यक्रम शाळा स्तरावर यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापकांच्या सभा घेऊन अडचणी निरसन केल्यामुळे व सतत पाठपुरावा केल्यामुळे सदर कार्यक्रमाची अमलबजावणी यशस्वी झाली.




● प्रशिक्षणाचे कृती नियोजन व सनियंत्रण आराखडा



● **यशोगाथा :--2 एक पाऊल पुढे-कन्या आमची गुणवत्तेचे शिखर चढे**

एस.ए.मिशन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालया नंदुरबार येथे जिल्हातील अतिदुर्गम भागातील, खेड्या पाड्यांतील विद्यार्थी शिकायला येतात. त्यांचेसाठी राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून वसतिगृहाची सोय देखील केली आहे. या शाळेतील मुली आदीवासी, दुर्गम भागातून आल्यामुळे त्यांना आरोग्य, स्वच्छता, अभ्यास ह्या सर्व बाबी पासून त्या दूर असतात. अज्ञान व अंधश्रद्धेचा पगडा असतो. त्यामुळे नवीन बदल स्वीकारणे त्यांना कठीण जाते. किशोरवयीन मुलींना नवीन शारीरिक बदल, मानसिक व भावनिक बदल स्वीकारणे कठीण जाते. मासिक पाळी या नवीन आव्हानाला सामोरे जाताना मुली खूप घाबरून जातात. शाळेत उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे हा प्रश्न त्रासदायक बनत होता. ही समस्या सोडविण्यासाठी मासिक पाळी व्यवस्थापनाविषयी महिला शिक्षकांमार्फत शास्त्रीय माहिती दिली जाते. वसतिगृह व शाळा दोन्ही ठिकाणी मुलींना मासिक पाळी बाबत माहिती मिळत असल्यामुळे त्यांचे दृढीकरण होऊन इतरांना देखील या मुली मासिक पाळीबाबत माहिती देतात. सर्व मुलींना मासिक पाळी काळात शाळेत असणाऱ्या सर्व सोयी सुविधांमुळे समाधानी असतात. मासिक पाळी काळात वापरलेल्या शोषक साहित्याचे व्यवस्थापन करण्यासाठी शाळेत INCINATOR मशीन संस्थेने बसवून दिले. मुलींना कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र खोली बांधून दिली. शाळेत मासिक पाळी वेंडिंग मशीन देखील बसविले, त्यामुळे मुलींना मासिक पाळी बाबत सर्वच बाबतीत नवनवीन माहिती मिळत गेली.व मुलींचे शाळेत गैरहजर राहण्याचे प्रमाण कमी झाले. परंतु हे सर्व शक्य होण्यासाठी कोणीतरी पुढाकार घेणे आवश्यक असते. योग्य वेळेस नेतृत्वाने उचललेले कृतीशील पाऊल हे शाळेचा पर्यायाने मनुष्यबळाचा विकास साध्य होण्यासाठी फलद्रूप ठरते. शाळेतील प्रत्येक उत्सव मुले-मुली एकत्रित साजरा करतात.

शाळेत संस्थाचालक,मुख्याध्यापक, यांनी प्रत्येक आव्हानाला सामोरे जाऊन किशोरवयीन मुलींच्या समस्या सोडविल्या,त्यामुळे मुलींना शाळा आपलीशी वाटून शाळेत सुरक्षित वाटू लागले. कुशल नेतृत्वाने केलेले हे काम इतरांना निश्चितच प्रेरणादायी आहे.

● **यशोगाथा:-3 पुढाकार बनला कुजबुजणाऱ्या विषयाचा वैज्ञानिक आधार**

नवापूर शहरातील आदिवासी बहुल क्षेत्रातील आमची श्रीमती प्रतापबा अभेसिंग सोढा सार्वजनिक मराठी हायस्कूल व हाजी ए.एम. व्होरा कनिष्ठ महाविद्यालय , नवापुर जि.नंदूरबार शाळेत मुलींचे प्रमाण 50%. त्यातील बराचशा मुली खेडेगावातून बसने येजा करतात, काही मुली बसच्या अनियमित वेळेमुळे शाळेत लवकर येतात. किशोरवयीन मुलींना येणा-या अडचणी, वाढते वय, शरीरात होणारे बदल,भावनिक बदल,मानसिक बदल, मुलींचा लाजरेपणा, अबोला इत्यादी अनेक कारणांमुळे मुली शाळेत शिक्षकांशी मनमोकळेपणे बोलत नाहीत . याच वयात मासिक पाळी येते व मुलींचे शाळेतील गैरहजेरीचे प्रमाण वाढते. मुलींच्या या समस्यांकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी शिक्षिकांची मदत घेतली .या सर्व गोष्टींचा विचार करुन शाळेत विशाखा समितीची स्थापना करण्यात आली असुन यात वरिष्ठ शिक्षिका यांची अध्यक्ष व सचिव म्हणून नेमणूक करुन सर्व शिक्षिका व प्रत्येक वर्गातीन मॉनिटर म्हणून विद्यार्थिनी यांची नियुक्ती करुन ठरविलेली उद्दिष्टे कशी साध्य होतील यासाठी कार्यवाही सुरु केली. शाळेत बऱ्याच मुली खेडे गावातून येत असल्यामुळे पावसात भिजल्या तर मुलीना शाळेत कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र खोली असावी असा विचार पुढे आला व सर्व शिक्षकांकडून निधी जमवून मुलींसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था केली.त्यामुळे मुलींच्या

उपस्थितीत चांगलाच फरक पडला. विद्यार्थिनींनी स्वच्छतागृहात घ्यावयाच्या काळजी बाबत शिक्षिका व ग़ावातील तज्ञ डॉक्टर मुलींना बोलते करु लागले. विद्यार्थिनी आपल्या समस्या शिक्षिकांना सांगू लागल्या.सर्व शिक्षिका मुलींच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन शंका समाधान करू लागल्या त्यामुळे मुलींना शाळा आपलीशी वाटू लागली. परंतु असे असली तरी मासिक पाळीचा काळात मुलींना येणा-या अडचणीं,त्यांना भेडसावणारे प्रश्न शरीरात होणारे बदल, मासिक पाळीच्या काळात शोषक साहित्याचा वापर व स्वच्छता विषयक सवयी, मासिक पाळीच्या काळात मुलींची शाळेतील अनुपस्थिती, मासिक पाळी या विषयावर खुलेपणाने न बोलता फक्त कुजबुजणे इत्यादी अनेक समस्या होत्या . या सर्व बाबींवर काहीतरी करावे या हेतूने शाळेतील शिक्षकांशी व सर्व संचालक मंडळाशी चर्चा केली.मुली खेडे गावातून शाळेत येतात त्यामुळे मासिक पाळीच्या काळात या मुलींसाठी शाळेत काय व्यवस्था करता येईल या विषयी सर्व शिक्षिकांशी चर्चा केली व शाळेत सेनिटरीपॅड ची व्यवस्था केली, परंतु हा तात्पुरता उपाय होता .कायम स्वरूपी प्रश्न सोडवण्यासाठी सर्व शिक्षकां समवेत गावातील प्रतिष्ठित व्यक्तींशी संपर्क साधला. त्यात नगरसेवक , नगराध्यक्षा ताई यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी शाळेला हॅपी नारी वेडींग पॅड मशीन उपलब्ध करुन दिले .



त्या अनुषंगाने नवापूर नगर परिषदेकडून 1 ऑगस्ट 2019 रोजी  सनिटरी पॅड मशिन मिळाले, उद्घाटन दिनांक 3 ऑगष्ट 2019 रोजी नगराध्यक्षाताई व इतर मान्यवरांच्या हस्ते झाले.



# मराठी हायस्कूलला सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीनचे उद्घाटन

## विशाखा समितीतर्फे स्तुत्य उपक्रम

। नवापूर प्रतिनिधी ।

**येथील** श्रीमती प्र.अ.सोदा सार्वजनिक मराठी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे विशाखा समिती अंतर्गत नुकतेच सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीनचे उद्घाटन उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी मिराबेन चोखावाला होत्या. उद्घाटक नवापूरच्या नगराध्यक्षा हेमलता पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नवापूर एज्युकेशन सोसायटीच्या संचालिक श्रीमती शितलबेन वाणी, नगरसेविका अरुणा पाटील, मंजू गावित, बबिता वसावे, मिनल लोहार होते. प्रमुख वक्ते डॉ.स्नेहल पाटील व्यासपीठावर उपस्थित होत्या. सुरुवात स्वागतगीताने करून स्वागतभेट म्हणून श्रावणमासानिमित्त वेलाचे बालतरु देण्यात आले. मिराबेन चोखावाला, डॉ. स्नेहल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक श्रीमती सी.एन.बडे, सूत्रसंचालन डॉ.योगिता पाटील तर आभार श्रीमती जयश्री चव्हाण यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्राचार्य मिलिंद वाघ, पर्यवेक्षक एम.जे.सोनवणे, सर्व महिला शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

तसेच विद्यार्थिनींना फ़क्त पाच रुपयात एक पॅड उपलब्ध होऊ लागले. जर एखाद्या विद्यार्थिनीकडे पैसे नसतील तर शिक्षिका स्व खर्चाने पॅड उपलब्ध करुन देतात. शाळेतील स्वच्छता गृहांचा नीटनेटका वापर, स्वच्छता गृहाच्या सफ़ाईसाठी सफ़ाई कामगाराची नेमणूक , वेळोवेळी डॉक्टरांचे अमूल्य मार्गदर्शन, वैद्यकीय तपासणी, सिकलसेलवर मार्गदर्शन,किशोरवयीन मुलींच्या समस्या,मासिक पाळी विषयी सर्व माहिती इत्यादी विविध उपक्रमांचे आयोजन शाळेत केले जाते.

वरील सर्व उपक्रमांमुळे मुलींना शाळा आपलीशी वाटू लागली,मुली मासिक पाळी विषयी कुजबूज न करता त्यांना जाणवणाऱ्या अडचणी स्पष्टपणे सांगू लागल्या. त्या सोडविण्याचा प्रयत्न सर्व शिक्षिका करीत आहेत.सर्व उपाय योजनांच्या आधारे खेड्यातील मुलींचे शाळेत प्रवेशाचे प्रमाण वाढत आहे.तसेच मुलींचे गैरहजेरीचे प्रमाण नगण्य झाले .अशा प्रकारे शिक्षिका भगिनींच्या मदतीने मुख्याध्यापक शाऴेतील मुलींमध्ये विश्वास निर्माण करण्यात यशस्वी झाले.

- **चिंतनात्मक प्रश्न**

**यशोगाथा : 1**

मासिक पाळी प्रशिक्षणाची अंमलबजावणी शाळास्तरावर होण्यासाठी नेतृत्वाने कार्यक्रमाचे नियोजन , सनियंत्रण व अंमलबजावणी कशा पद्धतीने केली आहे?

**यशोगाथा : 2**

मुलींच्या उपस्थितीची समस्या शाळेने कशी सोडवली ?

**यशोगाथा : 3**

या विद्यालयात आपणास काम करण्याची संधी प्राप्त झाल्यास आपले कामाचे नियोजन कसे असेल थोडक्यात लिहा

- **विचार करू, चर्चा करू**

नेत्रहीन मुलीला मासिक पाळी पहिल्यांदाच आली आहे अशा वेळेस आपण त्या मुलीला मासिक पाळी संकल्पना कशी स्पष्ट कराल?तिला मासिक पाळी व्यस्थापना च्या सर्व बाबी कशा समजून सांगाल?
असाच विचार आपण मतिमंद मुली,कर्णबधीर मुली ,शारीरिक अपंगत्व असलेल्या मुलींच्या बाबतीत देखील करू शकतो?

- **शाळा विकास आराखडा:--**

तुम्ही शाळेचे प्रमुख घटक आहात, तर शाळा विकास आराखडा बनविताना वरील सर्व बाबींचा बारकाईने विचार करून ‘मासिक पाळी व्यवस्थापन’, ही बाब विचारात घेऊन या मुद्याच्या अनुषंगाने कोणते नियोजन शाळा विकास आराख्याड्यात कराल? यावर चर्चा करा.व लिहा

- **मासिक पाळी व्यवस्थापन व नवे शैक्षणिक धोरण 2020**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मुलांची गळती रोखण्यासाठी पुरेशा पायाभूत सुविधा प्रदान करणे तसेच पूर्व प्राथमिक ते इयत्ता 12 वी पर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर नियमित प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध करून देण्याशिवाय पायाभूत सुविधांच्या आधारावर कोणतीही कमी राहू नये यासाठी विशेष काळजी घेतली जाईल. मुलींसाठी सुरक्षित वसतिगृहे बांधली जाणार आहेत. मुलांच्या शिकण्यासाठीच्या सर्व सोयी सुविधा शाळेत निर्माण केल्या जातील. पायाभूत सुविधा निश्चित झाल्यानंतर गुणवत्ता राखणे हीच महत्वाची भूमिका असेल, विद्यार्थी विशेष करून मुली आणि इतर सामाजिक –आर्थिकदृष्ट्या वंचित असलेले विद्यार्थी शाळेपासून वंचित होणार नाही याची काळजी घेतली जाईल. मुलींच्या शिक्षणासाठी ,स्व विकासासाठी सुविधांच्या उपलब्धतेबाबत भाष्य केले आहे.

- **मोड्यूल ची शालेय नेतृत्वाच्या अनुषंगाने उपयुक्तता -**

**जिल्हास्तर नेतृत्वाची भूमिका :-**

१) जिल्हास्तरावरून फक्त प्रशिक्षण देणे एवढी भूमिका मर्यादित न ठेवता संवेदनशील विषय हा शेवटच्या घटकापर्यंत कसा पोहचविता येईल यासाठी प्रयत्न करणे.

२) प्रशिक्षणाची उत्तम आखणी तर सर्वच करतात परंतु प्रत्येक शाळेत सदर प्रशिक्षण व्हावे यासाठी ROAD MAP तयार करून सूक्ष्म नियोजन करणे.

३) शाळेत प्रशिक्षण संपन्न होत आहे किवा कसे ,मुलीना विषय समजून सांगितला जात आहे किवा नाही ह्याचे सनियंत्रण करण्यासाठी उत्तम आखणी करणे.

४) परिणामासाठी प्रशिक्षण कसे घ्यावे याचे उत्तम उदाहरण .

**शाळास्तर नेतृत्व:--**

१) शाळा स्तरावर नेतृत्वाने समस्या कशी ओळखली व समस्या कशी सोडविली आहे हे स्पष्ट होते.

२) अतिदुर्गम भागातील मुलींना समजून सांगून, नावीन्यपूर्ण बाब शाळेत आण्यासाठी धडपड दिसून येते.

३) किशोरवयीन मुलींना मासिक पाळी विषयी समज देताना शिक्षिका ,संस्था चालक ,NGO, पालक याची मदत घेऊन आव्हानाला सामोरे जाऊन यश मिळविता येते .

एकूणच मासिक पाळी विषयी वरील मोडूयल हे आपणास आपल्या कार्यक्षेत्रात दिशादर्शक ठरेल. कदाचित भौगोलिक परिस्थिती वेगळी असेल,समस्या वेगळी असेल,परंतु नेतृत्वाची दिशा आपणास निश्चितच मार्गदर्शक ठरेल असा आत्मविश्वास वाटतो.

**संदर्भ सूची:----**


1) राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र ,पुणे आणि युनिसेफ यांच्या साहाय्याने मासिक पाळी व्यवस्थापन उपक्रमपरिपत्रक
2) युनिसेफ मासिक पाळी व्यवस्थापन मार्गदर्शिका
3) वयात येताना ; मंगला गोडबोले,डॉ.वैजयंती खानविलकर
4) लोकराज्य विशेषांक (पेज न.24 )
5) जीवन शिक्षण अंक
6) पहेली की सहेली फिल्म ( youtube )
7) सहेज app
8) [WWW.wikipedia .org](WWW.wikipedia.org)
9) youtube interview of yousuf kabir from unicef (essar founadation )
10) [www.menstrupedia.com](www.menstrupedia.com)
11) Hello periods
12) [www.nandurbarzp.com](www.nandurbarzp.com)
13) youtube DIET NANDURBAR CHANNEL.



| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| डॉ.वनमाला पवार | डॉ.ज्योती कुलकर्णी | डॉ.नेहा बेलसरे |
| अधिव्याख्याता | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |